जा.क्र./मरापप/जीसीसी/प्रशा/सं.टा./२०२१/ 572
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-०१
दिनांक :- 9D / ०२ / २०२१

प्रति,

**संस्थाचालक / प्राचार्य**
**शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) - मार्च २०२१**
**परीक्षा केंद्र निवडणेबाबत.**

**संदर्भ :- या कार्यालयाची अधिसूचना दि. १ डिसेंबर २०२०**

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत **शासकीय संगणक टंकलेखन प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) व स्पेशल स्किल इन कॉम्प्युटर टायपिंग इन्स्ट्रक्टर्स अॅण्ड स्टुडन्टस् (GCC-SSD-CTC) या दोनही परीक्षा दिनांक ०२ मार्च ते ३१ मार्च २०२१ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने** घेतली जाणार आहे.

संबंधित जिल्हा व तालुक्यातील विद्यार्थी संख्या, परीक्षा केंद्रास आवश्यक हार्डवेअर व सॉफ्टवेअर, इंटरनेट सुविधा, संगणक संच (LAB) या बाबींचा विचार करुन जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्य) / शिक्षण निरीक्षक मुंबई (उ/द/प) यांच्या शिफारशीने परीक्षा केंद्राची निश्चिती करण्यात आली आहे.

ज्या शासनमान्य संगणक टंकलेखन संस्थांनी या परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची ऑनलाईन आवेदनपत्रे भरली आहेत. त्या संस्थाची लॉगीनद्वारे या SELECT GCC-TBC EXAM CENTER MARCH - २०२१ या लिंकवर CLICK करुन उपलब्ध परीक्षा केंद्राच्या यादीमध्ये (DROP DOWN LIST) ज्या तालुक्यातील संगणक टायपिंग संस्था आहेत त्या संस्थांनी त्याच तालुक्यातील परीक्षा केंद्र निवडणे बंधनकारक आहे. परंतु अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या तालुक्यात परीक्षा केंद्र दिलेले नसल्यास संस्थांनी आपल्याच जिल्ह्यातील आपल्याच तालुक्याच्या शेजारील तालुक्यातील परीक्षा केंद्र निवडावे. परीक्षा केंद्र निवडीनंतर SUBMIT बटनावर CLICK करावे.

निवडलेल्या परीक्षा केंद्रावर विद्यार्थी क्षमता कमी असल्यास स्क्रीनवर सदर परीक्षा केंद्राची शिल्लक क्षमता ही तुमच्या संस्थेच्या एकूण विद्यार्थ्याच्या क्षमतेपेक्षा कमी आहे, तरी आपण या परीक्षा केंद्राबरोबर आणखी एक परीक्षा केंद्र निवडावे असा मेसेज दिसेल. त्यानंतर पुढील पैकी कोणत्याही एका पध्दतीने कार्यवाही करावी.

१. परीक्षा केंदाच्या ड्रॉपडाऊन लिस्टवर जाऊन CTRL बटन दाबून MOUSE च्या सहाय्याने अगोदर निवडलेल्या CENTER सह आणखी एक CENTER निवडावे व SUBMIT बटनावर CLICK करावे.

**किंवा**

२. SHIFT बटन आणि MOUSE किंवा ARROW KEY (UP/DOWN) च्या सहाय्याने अगोदर निवडलेल्या CENTER सह आणखी एक CENTER निवडावे CLICK केल्यानंतर आपणास अ.क्र., संस्था कोड, परीक्षा केंद्राचा कोड, परीक्षा केंद्राचे नाव व निवड केलेल्या केंद्रावरील आपल्या संस्थेची विद्यार्थी संख्या असे रकाने असलेली यादी दिसेल.

**केंद्र निवडीबाबत पुढील सूचना लक्षात घ्याव्यात.**

१. एकदा निवडलेले परीक्षा केंद्र बदलता येणार नाही. त्यामुळे परीक्षा केंद्राची निवड काळजीपूर्वक करावी.
२. परीक्षा केंद्रावरील बैठक व्यवस्था मर्यादित असल्याने एखाद्या संस्थेस एकापेक्षा अधिक परीक्षा केंद्र निवडावे लागतील म्हणजेच त्या संस्थेचे विद्यार्थी एकापेक्षा अधिक परीक्षा केंद्रावर विभागले जातील याची नोंद घ्यावी.
३. एखाद्या परीक्षा केंद्रावरील क्षमता संपल्यास ते केंद्र ड्रॉपडाऊन लिस्टमधून आपोआप कमी होईल. अशा परिस्थितीत उरलेल्या परीक्षा केंद्रामधून सोयीस्कर परीक्षा केंद्र संस्थांनी निवडावे.
४. निवडलेल्या परीक्षा केंद्रावर ऐनवेळी तांत्रिक किंवा इतर अडचणी उद्भवल्यास परीक्षा परिषदेकडून अन्य परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था केली जाईल.
५. दि. १० फेब्रुवारी २०२१ ते दि.१३ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत परीक्षा केंद्राची निवड लॉगिनद्वारे करणे अनिवार्य राहिल. परीक्षा केंद्राची ऑनलाईन निवड न केल्यास अशा संस्थेतील विद्यार्थ्यांची प्रवेशपत्रे दिली जाणार नाहीत. पर्यायाने परीक्षाही घेतली जाणार नाही.
६. परीक्षा केंद्र निवडीबाबत टपालाने- किंवा ई-मेलद्वारे पत्रव्यवहार करु नये.

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-०१.**

**प्रत :-**

१. **विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)**
२. **शिक्षणाधिकारी (माध्य) सर्व.**
३. **शिक्षण निरीक्षक (उ/द/प)**